16-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/15/2025 11:02 PM Page 1



## निवडक

### रवींद्र भवन दोन महीने राहणार बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १५: आगामी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (इफ्फी ) च्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी आणि रवींद्र भवन मार्ग येथील सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक दुरुस्ती आणि नूतनीकरणाची कामे हाती घेतली जात आहेत.त्यामूळे रवींद्र भवनचे मुख्य सभागृह जुलै ते ऑगस्ट या दोन महिन्यांसाठी बंद राहणार आहे . रवींद्र भवनचे अध्यक्ष राजेंद्र तालक यांनी ही महिती दिली. स्लॉटच्या वाढत्या मागणी लक्षात घेता तियात्र आयोजक आणि कलाकारांशी सल्लामसलत करण्यात आली आहे आणि हॉल बुक करण्याची परवानगी देण्यासाठी एक व्यवस्था आहे, असे तालक यांनी स्पष्ट केले, परंतु ही दुरुस्ती आणि नूतनीकरण ही काळाची गरज आहे यावर त्यांनी भर दिला.पाण्याची गळती रोखण्यासाठी दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या विविध ठिकाणांची उदाहरणे त्यांनी दिली आणि त्यासाठी छप्पर आणि इतर छताच्या भागांची दुरुस्ती केली जात आहे.

त्यानंतर त्यांनी सांगितले की, नवीन तंत्रज्ञानामुळे स्क्रीन, प्रोजेक्टर आणि इतर सुविधा जुने झाल्या आहेत आणि त्यामुळे अशा अद्ययावत सुविधा आणण्याची गरज आहे जेणेकरून इफ्फीशी संबंधित कार्यक्रमांसाठी रवींद्र भवन एक चांगले यजमान होऊ शकेल.तालक यांनी असेही स्पष्ट केले की पीडब्ल्यूडी संलग्न इमारतीत काम करत आहे आणि समितीची बैठक झाल्यानंतर या इमारतीच्या वापराच्या योजना नंतर जाहीर केल्या जातील.

कलाकार विशाल पै काकोडे आणि एंटरटेनमेंट सोसायटी ऑफ गोवा (ईएसजी) च्या प्रशासकीय मंडळाचे माजी सदस्य यांनी याबाबत बोलताना रवींद्र भवन व्यवस्थापनावर दुरुस्तीच्या कामांच्या आणखी एका फेरीबद्दल जोरदार टीका केली जिथे त्यांना वाटले की सांस्कृतिक संस्था कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टापेक्षा दुरुस्ती आणि नूतनीकरणावर जास्त खर्च करत आहे.

काकोडे यांनी गेल्या वर्षीच नव्हे तर मागील पाच वर्षांत झालेल्या दुरुस्तीचा उल्लेख केला आणि त्यावर किती पैसे खर्च झाले आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला, कारण त्यांनी आरोप केला की ही रक्कम ५-१० कोटींपर्यंत जाऊ शकते.

त्यांनी कंत्राटदाराच्या नावासह सध्याच्या दुरुस्ती कामांच्या खात्यांमध्ये पारदर्शकता आणण्याचे आवाहन केले.

पै तियात्रिस्ट हॉलची निर्मिती तियात्र नाटकांसाठी करण्यात आली होती, त्यामुळे मुख्य सभागृहाचे इफ्फी सेंटरमध्ये रूपांतर करणे योग्य आहे का असा प्रश्न काकोडे यांनी उपस्थित केला .संगीत, नृत्य किंवा नाट्य यासारख्या कलाकारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी रवींद्र भवनच्या संलग्न इमारतीचा वापर का केला जात नाही असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

# कदंबचे पणजी बसस्थानक झालेय घाणीचे ठिकाण !

## स्वच्छता आणि मूलभूत सुविधांची वानवा | प्रवासी व चालकांमध्ये संतापाची लाट

■ टीम दैनिक हेराल्ड





> केटीसीकडे भरपूर महसूल असूनही प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. आम्ही मागील अनेक महिन्यांपासून बसस्थानकाच्या स्थितीचा अभ्यास केला असून आतापर्यंत १० ते ११ वेळा जागेची पाहणी केली आहे. मात्र, अजूनही परिस्थितीत कोणताही सकारात्मक बदल झालेला नाही.
>
> -रोलँड मार्टिन्स ( गोवा कॅन )




**पणजी, दि. १५ :** गोव्याची राजधानी पणजी येथील केटीसी (कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) बसस्थानक हे दररोज हजारो प्रवाशांची ये-जा असलेले आणि मोठ्या प्रमाणात महसूल देणारे राज्यातील एक प्रमुख बसस्थानक आहे. मात्र, एवढा महसूल मिळत असूनही येथे स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालये, सुरक्षित वाहतूक व्यवस्था आणि अग्निसुरक्षा यांसारख्या प्राथमिक सुविधांचा अभाव असल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे प्रवासी आणि बसचालक यांच्यात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

बसस्थानक परिसरातील विदारक स्थिती ही जनतेच्या आरोग्य व सुरक्षिततेला धोका ठरू शकते, अशी चिंता स्थानिक नागरिक आणि सामाजिक संस्थांनी व्यक्त केली आहे. परिसरात जागोजागी गुटख्याच्या पिचकाऱ्या, विस्कळीत वाहतूक, सार्वजनिक ठिकाणी लघवी करणे आणि अग्निशमन यंत्रणांचा अभाव ही दृश्ये आता नेहमीची झाली आहेत.

बसस्थानकात शौचालयांची उपलब्धता असूनही ती सशुल्क असल्याने अनेक प्रवासी आणि चालक त्यांचा वापर टाळतात. परिणामी परिसरात अस्वच्छता वाढली असून सार्वजनिक लघवी ही नित्याची बाब बनली आहे. एका बसचालकाने सांगितले की,आम्ही दिवसभर या बसस्थानकावर असतो. पण शौचालयासाठी दरवेळी पैसे द्यावे लागतात. हे आम्हाला परवडणारे नाही. अशा मूलभूत सुविधा मोफत असायला हव्यात.

सामाजिक संघटना गोवा कॅन'चे संयोजक रोलँड मार्टिन्स यांनी या समस्यांकडे वारंवार शासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही मागील अनेक महिन्यांपासून बसस्थानकाच्या स्थितीचा अभ्यास केला असून आतापर्यंत १० ते ११ वेळा जागेची पाहणी केली आहे. मात्र, अजूनही परिस्थितीत कोणताही सकारात्मक बदल झालेला नाही.

ते पुढे म्हणाले, केटीसीकडे भरपूर महसूल असूनही प्रवाशांना आणि कर्मचाऱ्यांना गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. अग्निशमन उपाययोजना, स्वच्छता व्यवस्थापन आणि बस वाहतुकीचे नियोजन यावर त्वरित काम करणे गरजेचे आहे.

मार्टिन्स यांनी केटीसी प्रशासनाने तातडीने सर्व संबंधित यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची बैठक घेऊन समस्यांचे मूळ शोधून उपाययोजना आखाव्यात, अशी मागणी केली आहे. फक्त महसूल कमावणे हेच उद्दिष्ट नसून प्रवाशांची सुरक्षितता आणि सुविधा यालाही तेवढेच महत्त्व द्यावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांनी देखील अस्वच्छ परिसर, गोंधळलेली बस व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा अभाव आणि विस्कळीत माहिती फलक यांबाबत तक्रारी केल्या आहेत. एक महिला प्रवासी म्हणाली, बसस्थानकावर कुठली बस कुठे जाते याची माहिती व्यवस्थित मिळत नाही. तसेच, बस थांबे स्वच्छ नाहीत. पाण्याची सोय नाही. अशा ठिकाणी प्रवास करणे अवघड होते.

राजधानीतील प्रमुख बसस्थानकाची ही दुर्दशा असूनही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिस्थितीत सुधारणा होताना दिसत नाही. केटीसी प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने आवश्यक पावले उचलली नाहीत, तर प्रवासी आणि कर्मचारी यांचा रोष अधिकच वाढू शकतो.

# ३० दिवसांत २६ जणांचा अपघाती मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड




**पणजी,दि. १५ :** राज्यातील वाहतूक संचालनालयाने एप्रिल २०२५ महिन्यात घडलेल्या रस्ते अपघातांचा आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईचा मासिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात अत्यंत धक्कादायक माहिती पुढे आली असून, केवळ एप्रिल महिन्यात गोव्यात २६ जणांना रस्ते अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहेत.

अहवालानुसार, एप्रिल महिन्यात गोव्यात एकूण १९८ रस्ते अपघात नोंदवले गेले. त्यापैकी २६ अपघात हे प्राणघातक ठरले असून त्यात १२ मृत्यू उत्तर गोव्यात तर १४ मृत्यू दक्षिण गोव्यात झाले आहेत. याव्यतिरिक्त, १५ गंभीर स्वरूपाचे अपघात (उत्तर गोवा - ७, दक्षिण गोवा - ८), ४३ किरकोळ अपघात (उत्तर गोवा - १३, दक्षिण गोवा - ३०) आणि ११६ अपघात गैर-इजाग्रस्त स्वरूपाचे (उत्तर गोवा - ५१, दक्षिण गोवा - ६५) होते.

प्राणघातक अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये १७ दुचाकी चालक (उत्तर गोवा - ९, दक्षिण गोवा - ८), चार पीलियन रायडर्स (सर्व दक्षिण गोवा) आणि पाच पादचारी (उत्तर गोवा - ३, दक्षिण गोवा - २) यांचा समावेश आहे. याशिवाय १७ जण गंभीर जखमी (उत्तर गोवा - ८, दक्षिण गोवा - ९) तर ७६ जण किरकोळ जखमी (उत्तर गोवा - १८, दक्षिण गोवा - ५८) झाले आहेत.

राज्य सरकार व वाहतूक विभागाकडून अपघातांची संख्या कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. गोवा पोलिसांनी रस्ते अपघातांचे प्रमाण किमान २० टक्क्यांनी घटवण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. मात्र प्रत्यक्षात आकडेवारी पाहता, रस्ते अपघातांमध्ये वाढ होत असल्याचे स्पष्ट होते.

वाहतुकीचे वाढते प्रमाण, वाहने चालवताना असलेली बेफिकिरी, हेल्मेटचा अभाव, दारू पिऊन वाहन चालविणे आणि वाहतूक नियमांकडे होणारे दुर्लक्ष या साऱ्यामुळेच अपघातांचे प्रमाण गंभीर स्वरूप धारण करत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांचे प्रमाण मृतांमध्ये जास्त असल्यामुळे सुरक्षित वाहनचालनाबाबत जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे.

वाहतूक संचालनालयाने ही आकडेवारी प्रसिद्ध करताना नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, योग्य सुरक्षात्मक साधनांचा (जसे की हेल्मेट, सीट बेल्ट) वापर करावा, तसेच मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन केले आहे.

# दुर्भाट -रासय फेरी सेवा तात्पुरती स्थगित

## मुलांच्या धोकादायक कृतीमुळे निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. १५ :** दुर्भाट -रासय दरम्यान सुरू असलेली फेरी सेवा मुलांनी फेरीच्या वरून झुआरी नदीत उड्या मारल्याच्या घटनांनंतर कॅप्टन ऑफ पोर्ट्स विभागाने तात्पुरती स्थगित केली आहे. ही सेवा मागील २० दिवसांपासून बंद असून, स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये याबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दुर्भाट रॅम्पवर काही मुले अनधिकृतपणे फेरीवर चढून नदीत उड्या मारत होती. या मुलांनी केवळ रेलिंगवरून नव्हे, तर फेरीच्या छतावरूनही उड्या घेतल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे गंभीर सुरक्षितता धोका निर्माण झाला असून, विशेषतः फेरीच्या पाण्याखालील पंख्यांमुळे अपघाताची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दुर्भाट- आडपई- आगापूरचे सरपंच चंदन नाईक यांनी सांगितले की, फेरी सेवा स्थगित करण्याबाबत ग्रामपंचायतीकडे कोणतीही अधिकृत तक्रार आलेली नाही. मात्र, मुलांच्या असुरक्षित वर्तनामुळे कॅप्टन ऑफ पोर्ट्सने स्वतःहून ही सेवा थांबवली आहे. कॅप्टन ऑफ पोर्ट्सच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी सांगितले की, दुर्भाट- रासय सेवा स्थगित झाल्यानंतर सध्या आडपई - रासय मार्गावर फेरी सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे आडपई आणि रासय दरम्यान आता दोन फेरी सेवा चालू आहेत. ही सेवा फोंडा तालुक्यातून मुरगाव तालुक्याकडे, विशेषतः वेर्णा व रासय औद्योगिक वसाहतीत जाणाऱ्या कामगारांसाठी आणि वास्को-फोंडा दरम्यान प्रवास करणाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

फेरी सेवा स्थगितीबाबत प्रवाशांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काही प्रवाशांनी आडपई -रासय मार्गावरील प्रवास वेळ कमी असल्याने समाधान व्यक्त केले आहे. यामुळे प्रवासाचा कालावधी २५ मिनिटांवरून केवळ ५ मिनिटांपर्यंत कमी होतो, तसेच डिझेल व वेळेची बचतही होते.

तथापि, काही रहिवाशांनी दुर्भाट - रासय सेवा कायम ठेवण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, दुर्भाट रॅम्प हे निवासी भागात असून, विशेषतः महिलांसाठी सुरक्षित आहे. याउलट आडपई रॅम्पकडे जाणारा सुमारे १ किमीचा रस्ता दुर्गम असून, एकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांसाठी तो असुरक्षित ठरतो. याशिवाय, आडपई मधील अरुंद रस्ते आणि वेगात धावणारी वाहने यामुळे स्थानिकांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते, अशीही नागरिकांची भावना आहे.

# कोलवा एसटीपी प्रकल्पाला पुन्हा विलंब

## स्थानिकांचा सांडपाणी विभागावर संताप

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव,दि. १५ :** कोलवा येथील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पास (एसटीपी) जोडणी प्रक्रियेला पुन्हा एकदा विलंब झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वर्षानुवर्षे चाललेल्या रस्ते खोदकामानंतर देखील जोडणीचे काम वेळेत पूर्ण न झाल्याने रहिवासी आणि व्यावसायिकांमध्ये असंतोष पसरला आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी यापूर्वी ३१ मार्च २०२५ ही प्रकल्पाशी जोडणीची अंतिम तारीख जाहीर केली होती. मात्र, स्थानिकांना नुकतीच माहिती देण्यात आली की उर्वरित जोडण्या आता पावसाळ्यानंतरच पूर्ण केल्या जातील. त्यामुळे अनेकांनी आधीच केलेल्या खर्चावर पाणी फिरले आहे.

आम्हाला आधीच सूचित करण्यात आले होते की ३१ मार्चपर्यंत एसटीपीशी जोडणी आवश्यक आहे, अन्यथा आमचे पाणी कनेक्शन बंद केले जाईल. मी प्लंबिंग व दगडी कामासाठी एक लाखांहून अधिक खर्च केला आहे. काम चालू राहील, या अपेक्षेने मी माझा व्यवसायही काही काळ बंद केला. आता मात्र पुढील वर्षापर्यंत वाट पाहावी लागणार असल्याचे सांगण्यात आले आहे, असे एका स्थानिक रेस्टॉरंट मालकाने सांगितले.

या आठवड्यात स्थानिक अधिकाऱ्यांनी घेतलेल्या पाहणी दरम्यान, नागरिकांना सूचित करण्यात आले की सध्या रस्त्यांचे तात्पुरते पुनरुज्जीवन केले जाईल, परंतु जोडणीचे काम थांबवले जाईल.

या संदर्भात हेराल्ड मिडियाशी बोलताना बाणावलीचे आमदार वेंझी व्हिएगस यांनी सांडपाणी विभागावर टीकेची झोड उठवली. इतर विभाग जसे की सार्वजनिक बांधकाम विभाग एक-दोन आठवड्यांचा विलंब करतात, पण सांडपाणी विभाग तब्बल १० महिन्यांपेक्षा जास्त वेळ मुदती ओलांडतो, अशी टीका त्यांनी केली.

व्हिएगस म्हणाले की, कोलवा एसटीपीचे काम दोन वर्षांपूर्वीच पूर्ण व्हायला हवे होते. त्यांनी अलीकडेच झालेल्या पत्रकार परिषदेचा संदर्भ देत, कंत्राटदारांना देयके न मिळाल्यामुळे काम रखडल्याचे सांगत राज्य सरकारवरही ताशेरे ओढले.

कोलवा एसटीपी प्रकल्पाच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, चौथा वॉर्ड, जिथे एसटीपी आहे, तेथील बहुतांश आस्थापने प्रकल्पाशी जोडण्यात आली आहेत. किनाऱ्याजवळील दोन सार्वजनिक शौचालयेही या नेटवर्कशी जोडली गेली आहेत. मात्र, मुख्य अडथळा म्हणजे कोलवा सर्कलपासून सुमारे ५०० मीटर अंतरावरील मॅनहोलचे अपूर्ण काम. नियोजित ११ मॅनहोलपैकी केवळ चार सध्या पूर्ण झाले असून, येत्या काही दिवसांत आणखी दोनचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

या टप्प्यानंतर पावसाळ्यापूर्वी रस्ते डांबरीकरण करून सुरक्षित केले जातील, असे आश्वासन व्हिएगस यांनी दिले. त्यांनी यासंदर्भातील सर्व प्रगतीवर वैयक्तिक लक्ष असल्याचे सांगत सांडपाणी विभागाने न्यायालयात दिलेली लेखी आश्वासने अद्याप पूर्ण न केल्याची आठवण करून दिली.

# कळंगुट-कांदोळी समुद्रकिनाऱ्यावर गस्त वाढवली

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १५ :** बागा येथे नुकत्याच घडलेल्या सहा वर्षांच्या मुलाच्या बुडण्याच्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, पर्यटक पोलिस युनिटने (टीपीयू) कळंगुट ते सिकेरी दरम्यानच्या समुद्रकिनाऱ्यावर गस्त वाढवली आहे. विशेषतः सूर्यास्तानंतर जीवरक्षकांची ड्युटी संपल्यानंतर ही गस्त अधिक तीव्र करण्यात आली आहे.

पर्यटन हंगामात समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची वर्दळ वाढलेली असते. टीपीयूने मागील डिसेंबरपासूनच शॅक्स मध्ये घडणाऱ्या घटनांमुळे नियमित गस्त सुरू केली होती. आता ती अधिक बळकट करण्यात आली आहे, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, सूर्यास्तानंतर बागा व कळंगुट समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी लक्षणीय वाढते. अनेक वेळा लहान मुले पालकांच्या देखरेखीशिवाय पाण्यात उतरतात, त्यामुळे अपघाताची शक्यता वाढते. यामुळेच सूर्यास्तानंतरही गस्त सुरू ठेवून पर्यटकांना समुद्राच्या काठावर न थांबण्याचा सल्ला दिला जात आहे.

जीवरक्षकांनी पर्यटन हंगामातील अडचणी अधोरेखित करताना सांगितले की, अनेक पर्यटक नो स्विम झोन'च्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करतात. शिवाय मद्यप्राशनानंतर समुद्रात पोहणारे पर्यटक स्वतःच आपल्या जीवाला धोका निर्माण करतात, हे प्रकार वारंवार घडताना दिसत आहेत.

अंधार पडल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. स्थानिक पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दररोज सुमारे एक डझन फोन समुद्रकिनाऱ्यावरून चोरीला जातात. काही पर्यटक मद्यधुंद अवस्थेत समुद्रकिनाऱ्यावर झोपतात, तेव्हा चोरटे त्यांचा फायदा घेत त्यांच्या मौल्यवान वस्तू लंपास करतात. विशेषतः शनिवार-रविवारी अशा घटनांची संख्या वाढते.

काही पर्यटकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, फोन चोरी झाल्याची तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात गेल्यावर, ती तक्रार हरवलेली वस्तू' म्हणून नोंदवली जाते. ही चोरी आहे, हरवलेली घटना नाही. अशा प्रकारे तक्रारीची नोंद केल्याने चोरांना प्रोत्साहन मिळते,असे एका आंध्र प्रदेशातील पर्यटकाने सांगितले.

सूत्रांच्या माहितीनुसार, चोरीला गेलेले मोबाईल फोन म्हापसा येथील कुप्रसिद्ध चोर मार्केट'मध्ये विकले जातात. विशेषतः शुक्रवारी पहाटे स्थलांतरित मजुरांची गर्दी या मार्केटमध्ये दिसून येते, जे स्वस्तात फोन खरेदी करतात.

या संदर्भात माहिती देताना कळंगुट पोलीस निरीक्षक परेश नाईक यांनी सांगितले की, हरवलेले किंवा चोरीला गेलेले मोबाईल सीईआयआर पोर्टलवर नोंदवले जातात. तेथून फोन ब्लॉक केला जातो. जर एखादा फोन नवीन सिमसह पुन्हा वापरण्यात आला, तर तो आयएमईआय नंबरद्वारे ट्रॅक करता येतो.आयएमईआय नंबर मोबाईल डिव्हाइस ओळखण्यासाठी वापरला जातो आणि याच आधारे डिव्हाइस ब्लॉक अथवा अनब्लॉक करता येतो. त्यामुळे मोबाईल चोरी व फसवणूक टाळण्यास मदत होते, असेही नाईक यांनी स्पष्ट केले.